# महाराष्ट्र शासन

इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर**

पत्ता : डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दीक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर – ४४० ०२२

दूरध्वनी क्र.०७१२- २९५९३८१ CIN No. U८५३००PN२०१९NPL१८७४०५ ई-मेल: fellowshipmahajyoti@gmail.com

**जावक क्र.महाज्योती/पीएचडी२०२३/१८५८ /२०२४-२५,** **दि. ०१.०८.२०२४**

## सुधारीत परीपत्रक

**विषय :- महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर मार्फत महात्मा ज्योतीबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती (MJPRF- २०२३) संदर्भात कागदपत्र पडताळणी प्रक्रिया**

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, **महात्मा ज्योतिबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती (MJPRF-२०२३)** करिता पात्र दि.२५ जुलै, २०२४ रोजीच्या सार्वजनिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे शासन निर्णय नुसार कागदपत्रे पडताळणीस पात्र असलेल्या एकूण १३८१ विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, आपल्या मुळ कागदपत्रे/ कागदपत्रांची पडताळणी करण्याची प्रक्रिया यापुर्वी दि.३१.०७.२०२४ ते दि.०७.०८.२०२४ या कालावधीत करण्यात येणार होती. मात्र विद्यार्थ्यांच्या मागणीमुळे सदर कागदपत्र पडताळणी प्रक्रीया पुढे ढकलण्यात आलेली होती.

तरी आता कागदपत्र पडताळणी करण्याची प्रक्रिया **दि.०७ ऑगस्ट, २०२४ ते दि.२२ ऑगस्ट, २०२४ या कालावधीत** महाज्योती कार्यालय यांच्यामार्फत करण्यात येईल. त्यामुळे संबंधीतांनी पुढे नमूद सुचनेनुसार कार्यवाही करावी.

१) **दि.०७ ऑगस्ट, २०२४ ते दि.२२ ऑगस्ट, २०२४** या कालावधीत मुळ प्रमाणपत्रे/कागदपत्रे घेऊन उपस्थित राहावे. सदर कागदपत्रांची तपासणी खालीलप्रमाणे होणार आहे.

| अ.क्र. | तपासणीचा दिनांक | तपासणीकरीता उपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यांची यादी | एकूण विद्यार्थी |
|---|---|---|---|
| १ | दि.०७.०८.२०२४ | यादी क्र. १ :- अनु.क्र. ०१ ते १२५ | १२५ विद्यार्थी |
| २ | दि.०८.०८.२०२४ | यादी क्र. २ :- अनु.क्र. १२६ ते २५० | १२५ विद्यार्थी |
| ३ | दि.०९.०८.२०२४ | यादी क्र. ३ :- अनु.क्र. २५१ ते ३७५ | १२५ विद्यार्थी |
| ४ | दि.१२.०८.२०२४ | यादी क्र. ४ :- अनु.क्र. ३७६ ते ५०० | १२५ विद्यार्थी |
| ५ | दि. १३.०८.२०२४ | यादी क्र. ५ :- अनु.क्र. ५०१ ते ६२५ | १२५ विद्यार्थी |
| ६ | दि. १४.०८.२०२४ | यादी क्र. ६ :- अनु.क्र. ६२६ ते ७५० | १२५ विद्यार्थी |
| ७ | दि. १६.०८.२०२४ | यादी क्र. ७ :- अनु.क्र. ७५१ ते ८७५ | १२५ विद्यार्थी |
| ८ | दि. १९.०८.२०२४ | यादी क्र. ८ :- अनु.क्र. ८७६ ते १००० | १२५ विद्यार्थी |
| ९ | दि. २०.०८.२०२४ | यादी क्र. ९ :- अनु.क्र. १००१ ते ११२५ | १२५ विद्यार्थी |
| १० | दि. २१.०८.२०२४ | यादी क्र. १० :- अनु.क्र. ११२६ ते १२५० | १२५ विद्यार्थी |
| ११ | दि. २२.०८.२०२४ | यादी क्र. ११ :- अनु.क्र. १२५१ ते १३८१ | १३१ विद्यार्थी |

२) **महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर-४४० ०२२ या पत्त्यावर ठीक सकाळी ११.०० वाजेपासून दु.०५.०० वाजेपर्यंत सोबत नमूद मुळ कागदपत्रांसहित उपस्थित रहावे व संबंधितांनी मुळ प्रमाणपत्रे/ कागदपत्रांची पडताळणी करुन घ्यावी.**

३) ज्या मूळ प्रमाणपत्रे/ कागदपत्रांची पडताळणी करावयाची आहे त्या कागदपत्रांची यादी योबत जोडण्यात आलेली आहे तसेच अर्जाची प्रत सोबत आणावी.

४) अर्जाची प्रत व मूळ कागदपत्रांची क्रमवार झेरॉक्स स्वयं साक्षांकित करुन सादर करावी, केवळ प्रतिज्ञापत्र मा. कार्यकारी दंडाधिकारी यांच्या कोर्टात Affidavit करुन मूळ प्रतीत सोबत सादर करावे. तसेच सोबत देण्यात आलेल्या Cover Page (Annewure - II see attachment) व प्रपत्र ब (see attachment) डाऊनलोड करुन मुळ प्रतीत सादर करावे.

५) ज्या क्रमाने यादीतील प्रमाणपत्रे/ कागदपत्रे मागविली आहेत, त्याच क्रमाने मूळ प्रमाणपत्रे/ कागदपत्रे पडताळणी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना दाखवावीत, जेणेकरुन वेळेची बचत होऊ शकेल.

६) मूळ प्रमाणपत्रे/ कागदपत्रे पळताळणी करण्याकरिता महाज्योती कार्यालयात आल्यावर आपण प्रथम नोंद करुन घेणे आवश्यक राहील, नोंदणी केलेल्या क्रमाने कागदपत्रांची पडताळणी करण्यात येईल.

७) कागदपत्रांची पडताळणी करतांना अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याशी कोणत्याही प्रकारचा वाद विवाद करु नये. कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा शंका असल्यास प्रकल्प व्यवस्थापक यांच्याशी भेटून आपली शंका किंवा समस्या दूर करावी.

८) आपल्या अर्जात कोणत्याही प्रकारची दुरुस्ती असेल तर आपण ती मूळ कागदपत्रांची तपासणी करताना संबंधित अधिकारी-कर्मचारी यांना सदर बाब निदर्शनास आणून द्यावी व दुरुस्ती करुन घ्यावी.

९) कोणतेही मूळ कागदपत्रे जमा करु नये, उमेवारांनी आपल्या मूळ कागदपत्रांची काळजी स्वत: घ्यावी, कागदपत्रे गहाळ झाल्यास महाज्योती कार्यालय जबाबदार राहणार नाही.

१०) ज्या महिला उमेदवार गर्भवती असतील, अशा महिला उमेदवारांनी mahajyotifellowship2023@gmail.com या मेलवर अनुपस्थितीचा अर्ज डॉक्टरांच्या आवश्यक प्रमाणपत्रासह सादर करावा, अश्या उमेदवार आपल्या पालक किंवा प्रतिनिधीमार्फत मूळ कागदपत्रे पाठवून पडताळणी करुन घेण्यास हरकत नाही.

११) कागदपत्रे पडताळणी करिता कोणत्याही प्रकारचा भत्ता/खर्च किंवा प्रवास खर्च या कार्यालयाकडून देण्यात येणार नाही.

१२) **मूळ प्रमाणपत्रे/ कागदपत्रांची पूर्तता न करणाऱ्या तसेच तपासणीच्या दिवशी अनुपस्थित राहणाऱ्या उमेदवारांचा अर्ज रद्द ठरविण्यात येईल, याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.**

१३) मूळ प्रमाणपत्रे/ कागदपत्रांची पडताळणी झाल्यावरच विहीत नियमानुसार पात्रता व अपात्रता ठरविण्यात येईल.

१४) मा.अमुस (वित्त) यांच्या कायमस्वरुपी समितीने दिलेल्या निर्देशाचे पालन वेळोवेळी करणे विद्यार्थ्यांना बंधनकारक राहील.

आपल्या काही शंका असल्यास महाज्योतीच्या कॉल सेंटर वर कार्यालयीन वेळेत दूरध्वनीवरून संपर्क करावा.

**-स्वा-**
**(राजेश खवले)**
**व्यवस्थापकीय संचालक**
**महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था**
**(महाज्योती),महाराष्ट्र राज्य, नागपुर**.

प्रतिलिपी :-
सर्व महात्मा ज्योतिबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती (MJPRF-2023) चे पात्र उमेदवार